# मेट्रोच्या विद्युत-यांत्रिक प्रणालींसाठी करार

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचा डेपो आणि आरे स्थानक यांच्या विद्युत-यांत्रिक प्रणालींसाठी ब्लु स्टार कंपनीसोबत करार केला आहे. अत्याधुनिक विद्युत, वातानुकूल, अग्निशमन यंत्रणा, विद्युत ओव्हरहेड क्रेन, प्लम्बिंग, एअर कॉम्प्रेसर प्रणाली आणि इमारत व्यवस्थापन यंत्रणा (बीएमएस) निर्माण करण्यासाठी तंत्रशुद्ध, तसेच व्यापक दृष्टिकोनातून एमएमआरसीने आखणी केली आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने हा करार करण्यात आला, असे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.